क्र : बीएम्आरडीए/एम्टीजी/३५.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
५ वा मजला, गृहनिर्माण भवन,
वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१

दिनांक : १८ ऑक्टोबर, १९८४.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक २८ सप्टेंबर, १९८४ रोजी झालेल्या परिसभेच्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठविली आहे.

सन्माननीय सदस्यांनी या बाबतीत काही हरकती असल्यास त्या कृपया कळवाव्या ही विनंती.

( ज. रा. संसारे )
सचिव,
कार्यकारी समिती

प्रति :

सर्व सदस्य,
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे सर्व अधिकारी

-------

No.BMRDA/MTG/35.

BOMBAY METROPOLITAN REGION
DEVELOPMENT AUTHORITY,
Griha Nirman Bhavan,
5th floor, Bandra(East),
BOMBAY-400 051.

October 18, 1984.

The minutes of the 35th meeting of the Bombay Metropolitan Region Development Authority held on the 28th September, 1984 are enclosed.

Members are requested kindly to intimate their objections, if any.

( J.R. SANSARE )
SECRETARY,
EXECUTIVE COMMITTEE.

To:

All Members.

The Officers of the B.M.R.D.A.

LP:841017:

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या
३५ व्या बैठकीचे कार्यवृत्त

दिनांक : २८ सप्टेंबर, १९८४ (शुक्रवार)

वेळ : सकाळी ११.०० वाजता.

सभास्थान : माननीय मुख्यमंत्री यांचा समिती कक्ष,
(६वा मजला), मंत्रालय.

उपस्थित सदस्य :

१) श्री. वसंतराव पाटील, अध्यक्ष.
मा. मुख्यमंत्री आणि
नगर विकास मंत्री.

२) श्री. युसुफ हारुन, सदस्य.
विधान सभा सदस्य.

३) श्री. नकुल पुंडलिक पाटील, सदस्य.
विधान सभा सदस्य.

४) डॉ. राममनोहर वि. त्रिपाठी, सदस्य.
विधान परिषद सदस्य.

५) श्री. रा. द. प्रधान, सदस्य.
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन.

६) श्री. द. म. सुकथनकर, सदस्य.
महापालिका आयुक्त,
मुंबई महानगरपालिका.

७) श्री. ल. चं. गुप्ता, सदस्य.
व्यवस्थापकीय संचालक.

८) श्री. अ. ना. वटब्याल, सदस्य-सचिव.
महानगर आयुक्त,
मुं. म. प्र. वि. प्राधिकरण.

श्री. युसुफ हारुन, श्री. नकुल पुंडलिक पाटील व डॉ. राममनोहर वि. त्रिपाठी यांची राज्य सरकारने प्राधिकरणाचे सदस्य म्हणून नियुक्ती केल्यानंतर ते प्रथमतः च प्राधिकरणाच्या बैठकीस उपस्थित होते. अध्यक्षांनी त्यांचे स्वागत केले.

....२/-

<u>बाब क्र.१ :</u> <u>मागील (३४व्या) बैठकीचे कार्यवृत्त पक्के करणे</u>

मागील बैठकीचे कार्यवृत्त पक्के करण्यात आले.

<u>बाब क्र.२ :</u> <u>मागील (३४व्या) बैठकीच्या कार्यवृत्तावर केलेली कार्यवाही</u>

प्राधिकरणाने कार्यवाही अहवालाची नोंद घेतली.

<u>बाब क्र.3 :</u> वांद्रे-कुर्ला समूहाच्या 'इ' ब्लॉकमधील सी-२३ व सी-२४ या दोन वाणिज्य भू खंडाचे आणि क्र.१च्या निवासी भू खंडाचे अधिमूल्य निर्धारण व त्यांची नियत वाटपाने विक्री

---

ही बाब बैठकीपुढे ठेवताना महानगर आयुक्तांनी जिल्हाधिकारी.केंद्रीय उत्पादन शुल्क.(१) मुंबई (The Collector,Central Excise(I), Bombay) यांनी जमिनीच्या हस्तांतरणासाठी आवश्यक असलेल्या देय रकमेचा धनादेश प्राधिकरणाकडे पाठविला आहे असे सांगितले. सदर अधिकाऱ्यास देकार कळविताना ही बाब प्राधिकरणाच्या संमतीसापेक्ष आहे असे स्पष्टपणे कळविले होते असे असतांनाही वरील प्रमाणे त्यांनी रकमेचा भरणा केला आहे.

वरील बाबीवर विचारविमर्श करून प्राधिकरणाने वाणिज्य भू-खंड अनुक्रमे जिल्हाधिकारी.केंद्रीय उत्पादन शुल्क (१) मुंबई आणि सहाय्यक संचालक दुय्यम गुप्तवार्ता केंद्र. भारत सरकार ( Asstt. Director, Subsidiary Intelligence Bureau,GOI ) यांना प्रत्येकी एक व निवासी भू-खंड जिल्हाधिकारी.केंद्रीय उत्पादन शुल्क (१) मुंबई यांना द्यावा असे ठरविले. त्याप्रमाणे वाणिज्य भू खंडाचा प्रति चटई क्षेत्र निर्देशांक चौ.मीटरला रु.२८०० व निवासी भू खंडाचा प्रति चटई क्षेत्र निर्देशांक चौ.मीटरला रु.१८०० असे दर ठरविले व खालील प्रमाणे ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.२६३ :</u>

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की. या प्राधिकरणाने दि.२८ मार्च.१९८४ रोजी आपल्या बैठकीत मंजूर केलेल्या क्र.२४८ च्या ठरावात किरकोळ फेरफार करून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम १९७४ च्या कलम 3 च्या उपकलम (२) खालील प्रदत्त शक्तीचा वापर करून हे प्राधिकरण (१) वांद्रे-कुर्ला समूहाच्या 'इ' ब्लॉकमधील सी-२३ व सी-२४ या दोन वाणिज्य भू खंडाचा प्रति चटई क्षेत्र निर्देशांक चौ.मीटरला रु.२८०० या अधिमूल्य दराने जिल्हाधिकारी.केंद्रीय उत्पादन शुल्क (१) मुंबई व सहाय्यक संचालक.दुय्यम गुप्तवार्ता केंद्र.भारत सरकार यांना प्रत्येकी एक भू खंड आणि (२) 'इ' ब्लॉकमधील 'एफ्' निवासी भू खंडाचे प्रति चटई क्षेत्र निर्देशांक चौ.मीटरला रु.१८०० अधिमूल्य दराने

...3/-

जिल्हाधिकारी. केंद्रीय उत्पादन शुल्क (१) मुंबई यांना नियत वाटप करण्यास हे प्राधिकरण आपली मान्यता देत आहे. आणि त्या संदर्भात लाभधारक अर्जदारांना आवश्यक ते देकार करण्यासाठी महानगर आयुक्तांना हे प्राधिकरण प्राधिकृत करीत आहे.

"त्यापुढे असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की. लाभधारक अर्जदाराशी वरील संदर्भात भाडेपट्टा-करारनामा नमुना आणि भाडेपट्टा विलेख निष्पादीत करण्यासंबंधी प्र-नमुन्यात उचित दुरुस्त्या करणे आवश्यक ठरल्यास तशा त्या करण्यासाठी महानगर आयुक्तांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

बाब-क्र.४ : वांद्रे-कुर्ला समूहातील "एफ्" ब्लॉकच्या नियोजन प्रस्तावात किरकोळ फेरफार : सामाजिक परिवर्तन अभ्यास केंद्रासाठी जमीन देणे

वरील बाबीवर चर्चा केल्यानंतर प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला :

ठराव क्र.२६४ :

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की. अधिसूचीत वांद्रे-कुर्ला समूहाच्या 'एफ्' ब्लॉकमधील १.०६ हेक्टर क्षेत्राचा एक भू खंड सामाजिक परिवर्तन अभ्यास केंद्र या संस्थेसाठी राखून ठेवण्यात यावा आणि प्रति चौ.मीटरला रु.१५०/- या दराने सदर भू-खंडावरील जलमार्ग खोदाईचा आकार या केंद्राला भरण्यास सांगण्यात यावे.

"त्यापुढे असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण हे महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ च्या (१९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.३७) कलम ४०(१) (क) खालील वांद्रे-कुर्ला अधिसुचित क्षेत्रासाठी नियुक्त झालेले एक विशेष नियोजन प्राधिकरण या नात्याने उक्त अधिनियमाच्या कलम ४०(३) सोबत कलम ११३(८) आणि त्याबरोबरीने कलम ३७ याव्दारे त्याला प्रयोज्य असलेल्या आणि प्राधिकरणाला त्या संदर्भात सक्षम बनविणा-या इतर सर्व शक्तींचा वापर करुन. राज्य शासनाने आपल्या दिनांक ९ एप्रिल १९७९ च्या अधिसूचना क्र.बीकेआर-११७७/२६२-युडी-५ खाली मान्यता दिलेल्या नियोजन प्रस्तावात कार्यसूचीच्या बाब टिप्पणीत वर्णन केलेले फेरफार करण्यास याव्दारे मान्यता देत आहे. त्याचप्रमाणे नियोजन प्रस्तावासंदर्भात महानगर आयुक्तांनी महसूल व वन विभाग, नगर विकास विभाग आणि गृहनिर्माण विभाग यांच्याशी होणा-या चर्चेच्या अनुरोधाने विचारविमर्श करुन ते अंतिम करावेत असाही आदेश हे प्राधिकरण देत आहे.

"त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की. उक्त अधिनियमाच्या कलम ३७ खालील प्रयोज्य शक्ती आणि त्या संदर्भात सक्षम बनविणा-या इतर सर्व

शक्तींचा वापर करुन हे प्राधिकरण वरील प्रकारच्या फेरफाराच्या अनुलक्षून शासन राजपत्र आणि दोन स्थानिक वृत्तपत्रे ती येणेप्रकारे : टाईम्स् ऑफ इंडिया (किंवा फ्री प्रेस जर्नल) आणि लोकसत्ता यामध्ये नोटीस प्रकाशित करुन व ती प्रकाशित झाल्यापासून एक महिन्याहून अधिक नाही इतक्या कालावधीच्या आत फेरफारासंदर्भात आम जनतेकडून हरकती वा शिफारशी मागविण्यासाठी अशा नोटीशीच्या प्रकाशनास मान्यता देत आहे.

"त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम १९७४ च्या कलम १३९ खालील आणि सोबत उक्त अधिनियमाचे कलम ७(अ) याव्दारे प्रयोज्य असलेल्या आपल्या शक्तींचा वापर करुन हे प्राधिकरण सदर नोटीस पूर्वगामी खंडासह प्रकाशित करण्यास महानगर आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे.

"त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम १५१ (३) खाली प्रयोज्य असलेल्या शक्तींचा वापर करुन हे प्राधिकरण नोटीस प्रकाशनानंतर फेरफारासंदर्भात जनतेकडून ज्या हरकती वा सूचना आलेल्या असतील त्यावर महानगर आयुक्तांनी अशा हरकती वा सूचना सादर करणाऱ्या व्यक्तीचे म्हणणे ऐकून घेऊन विचारविमर्श करावा आणि उक्त अधिनियमाच्या कलम ३७ नुसार आवश्यक असल्याप्रमाणे, त्यांनी प्रस्तावित फेरफार आपल्या अहवालासह अंतिम प्रकाशनासाठी राज्य शासनाला सादर करावेत असाही आदेश देत आहे."

बाब क्र.५ : <u>ओशिवरे जिल्हा विकास केंद्रासाठी नियोजन प्रस्ताव</u>

ओशिवरे जिल्हा विकास केंद्राच्या प्रस्तावावर विचार सुरु होण्यापूर्वी प्राधिकरणाचे सदस्य श्री. युसुफ हारुन यांनी या योजनेमध्ये समाविष्ट असलेल्या जमिनीवरील काही प्रगणित झोपड्या मुंबई महानगरपालिकेने स्मशान भूमीजवळील रस्त्याच्या बांधकामासाठी पाडलेल्या आहेत, त्यांच्या पुनर्वसनासाठी जागा देण्यात यावी असे सुचविले. या बाबीवर महानगर आयुक्तांनी असे सूचित केले की, उपरोक्त पुनर्वसनासाठी मागणी करण्यात येत असलेली जागा विकास केंद्राच्या मध्यवर्ती वाणिज्य विभागात समाविष्ट असल्याने त्या जागेवर पुनर्वसन करता येणार नाही, तथापि पर्यायी जागा देण्याबाबत महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या संबंधित अधिकाऱ्यांशी ते या बाबत मार्ग काढण्यासाठी चर्चा करतील.

वरील बाबीवर चर्चा केल्यानंतर प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला.

<u>ठराव क्र.२६५ :</u>

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ (यापुढे त्याचा उल्लेख उक्त अधिनियम असा केला) कलम ४० च्या

३७७

उप-कलम ३ च्या खंड (ड) खालील प्रयोज्य शक्तींचा व त्या सोबत दि.१८ जून १९८२ ची अधिसूचना क्र.टीपीबी/४३८२/२६-युडी-५ मधील तरतुदी यांना अनुसरून आणि त्या संदर्भात त्याला सक्षम बनविणा-या अन्य सर्व शक्तींचा वापर करून हे महानगर प्राधिकरण, ओशिवरे जिल्हा केंद्र अधिसूचित क्षेत्रासाठी वरील शासन अधिसूचनेत विनिर्दिष्ट असल्याप्रमाणे एक विशेष नियोजन प्राधिकरण या नात्याने विशेष नियोजन प्राधिकरणाच्या सीमा क्षेत्रात मोडणा-या जमिनींवरील प्रारुप नियोजन प्रस्ताव प्रकाशित करून तशी नोटीस महाराष्ट्र शासन राजपत्रात आणि (१) टाईम्स ऑफ इंडिया किंवा फ्री प्रेस जर्नल व (२) लोकसत्ता या दोन स्थानिक दैनिकांमध्ये उक्त अधिनियमाच्या कलम २६ खाली विहीत पध्दतीने प्रकाशित करून व महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रकाशित झाल्यापासून ३० दिवसांपेक्षा कमी नाही इतक्या कालावधीत आम जनतेकडून हरकती वा शिफारशी मागविण्यासाठी म्हणून अशा नोटीशीच्या प्रकाशनास मान्यता देत आहे.

"त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम १३७ अनुसार महानगर आयुक्तांनी महानगर प्राधिकरणाचे सचिव या नात्याने सदर नोटीसीवर अधिस्वाक्षरी करून ती नोटीस प्रकाशित करण्यात यावी असा आदेश प्राधिकरण देत आहे.

"त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम २८ च्या उप-कलम २ खालील प्रयोज्य शक्तींचा आणि त्याला या संदर्भात सक्षम बनविणा-या इतर सर्व शक्तींचा वापर करून हे महानगर प्राधिकरण उपरोक्त प्रारुप प्रस्तावांना अनुलक्षून प्राप्त होणा-या सूचना आणि हरकती (१) श्री.युसुफ हाफीज [illegible] (२) आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका व (३) महानगर आयुक्त या सदस्यांचा अंतर्भाव असलेल्या नियोजन समितीकडे अग्रेषित करण्यास मान्यता देत आहे. तसेच सदर नियोजन समितीला त्या हरकती वा सूचनांवर प्रचलित कायद्यातील तरतुदींबरहुकूम उचित कारवाई करण्याचा आदेश देत आहे."

<u>बाब क्र.६ :</u> कनिष्ठ अभियंत्यांच्या वेतनश्रेणीत सुधारणा आणि उप अभियंते आदींना शासन आदेशानुसार उच्चस्तर प्रारंभिक वेतन देण्याबाबत

वरील बाबीवर चर्चा केल्यानंतर प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला.

<u>ठराव क्र.२६६ :</u>

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, दिनांक १६ एप्रिल १९८४ च्या शासन आदेश (पाटबंधारे विभाग) क्र.सीडीएस-१५८२/१५८/(२१५)अ(१०)मधील तरतुदींना अनुसरून हे प्राधिकरण --

(१) उक्त शासन निर्णयात निर्दिष्ट केलेल्या शर्तींची पूर्तता करणा-या कनिष्ठ अभियंत्यांना रु. ६००-९५० ही वेतनश्रेणी मंजूर करून त्यांचे उप अभियंते श्रेणी-२ असे नव्याने पदनाम निर्देशन करण्यास,

(२) रु.६००-११५० ही वेतनश्रेणी धारण करणा-या उप अभियंत्यांना रु.६६० चे उच्चस्तर प्रारंभिक वेतन मंजूर करून त्यांचे उप-अभियंता श्रेणी-१ असे नव्याने पदनाम निर्देशन करण्यास, आणि

...६/-

(३) वर उल्लेखित (१) आणि (२) मध्ये उल्लेखित प्रस्तावांची दि.१ एप्रिल १९८१ पासून पूर्वलक्षी प्रभावाने कार्यवाही करण्यास मान्यता देत आहे. वर उल्लेखित (१) मधील उप अभियंता श्रेणी-२ ची पदे कनिष्ठ अभियंत्यांच्या एकूण पद संख्येच्या २५ टक्यांहून अधिक रहाणार नाहीत."

बाब क्र.७ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या सेवेतील कर्मचाऱ्यांना अंतरिम वाढ मंजूर करणे

वरील बाबींवर विचार करून प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला.

ठराव क्र.२६७ :

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, महाराष्ट्र शासनाने शासकीय कर्मचाऱ्यांना दिनांक ११ सप्टेंबर १९८४ च्या शासन निर्णय (वित्त विभाग) क्रमांक पीसीआर १०८३/सीआर-१०८४/एसईआर-७, अन्वये मंजूर केलेल्या अंतरिम वाढीच्या धर्तीवर, प्रस्तावित केल्याप्रमाणे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या सेवेतील कर्मचाऱ्यांनाही दिनांक १ जून १९८३ पासून अंतरिम वाढ देण्यास हे प्राधिकरण या ठरावान्वये मान्यता देत आहे."

बाब क्र.८ : वांद्रे-कुर्ला समूहाच्या अधिसूचित क्षेत्रासाठी असेलेले एक विशेष नियोजन प्राधिकरण या नात्याने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने तयार केलेला प्रस्तुत अधिसूचित क्षेत्राचा (१९८३-८४) वार्षिक अहवाल

वरील बाबींवर विचार करून प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला.

ठराव क्र.२६८ :

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम १३३ खाली आवश्यक असल्याप्रमाणे आणि वांद्रे-कुर्ला समूहाच्या अधिसूचित क्षेत्रासाठी नियुक्त झालेले एक विशेष नियोजन प्राधिकरण या नात्याने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने सदर क्षेत्रासाठी तयार केलेला १९८३-८४ सालाचा वार्षिक अहवाल हे प्राधिकरण मंजूर करीत आहे. तसेच तो अहवाल राज्य शासनास सादर करण्यासाठी महानगर आयुक्तांना या ठरावान्वये प्राधिकृत करण्यात येत आहे."

बाब क्र.९ : वांद्रे-कुर्ला समूहाच्या 'डी' ब्लॉकचा विकास

वरील बाबींवर विचार करून प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.२६९ :

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, बाब टिप्पणीत प्रस्तावित केल्याप्रमाणे अनंत काणेकर मार्ग पश्चिम द्रुत महामार्गाशी जोडण्यासाठी आवश्यक असलेल्या संबंधित साकवाच्या बांधकामावरील खर्चाचा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने अदा करावयाचा रु. १,८७,५००/- चा वाटा सार्वजनिक बांधकाम विभागाला अदा करण्यास हे प्राधिकरण मान्यता देत आहे. आणि भविष्यात त्या विभागाने अतिरिक्त रकमेची मागणी केल्यास प्राधिकरणाच्या

वतीने खर्चाचा प्रमाणशीर वाटा उचलण्यासाठी योग्य ती कृती करण्याकरिता महानगर आयुक्तांना हे प्राधिकरण प्राधिकृत करीत आहे."

बाब क्र.१० : बॅक-बे रिक्लेमेशन योजना, ब्लॉक क्र.३, भू-खंड क्र.१४८ च्या वापरात बदल

वरील बाब बैठकीसमोर मांडताना महानगर आयुक्तांनी अशी माहिती दिली की, राज्य शासनाच्या (महसूल व वन विभाग) दि.२० ऑक्टोबर १९८३ च्या शासन निर्णय क्र.एलबीएल-२५६५/४०५५९/भाग३/जी-८ अन्वये अनुज्ञेय वापरास धरुन नॅशनल सेंटर फॉर परफॉर्मिंग आर्टस् या संस्थेच्या भू खंडाचा विकास करण्या-संदर्भात अर्ज प्राप्त झालेला आहे. परंतु मुंबई महानगरपालिकेने प्रकाशित केलेल्या प्रारुप विकास योजना आराखडयात सदर भू खंड फिक्ट लाल रंगाने दाखविलेला आहे. फिक्ट लाल रंग ती जागा सार्वजनिक प्रयोजनासाठी असल्याचे सूचित करतो. त्यावर प्राधिकरणाने नॅशनल सेंटर फॉर परफॉर्मिंग आर्टस् या संस्थेच्या भू-खंडाचा शासन आदेशाबरहुकूम वापर व्हावा असा आदेश दिला.

वरील बाबीवर चर्चा केल्यानंतर प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला :

ठराव क्र.२७० :

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, हे प्राधिकरण राज्य शासनाचे दिनांक ४ सप्टेंबर १९८४ चे पत्र क्र. बीबीआर १९८४/३६६५/युडी-५ याव्दारे अभिलिखित करीत आहे.

"त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम ४०च्या उप-कलम (३) च्या खंड (ड) खालील प्रदत्त आणि त्याला त्या संदर्भात सक्षम बनविणाऱ्या इतर सर्व प्रयोज्य शक्तींचा वापर करुन राज्य शासनाच्या दिनांक १५ जून, १९८३ ची अधिसूचना, नगर विकास विभाग क्र.बीबीआर १०८२/सीआर-१४०/१६८७/युडी-१ मध्ये वर्णित अनुसूचीत वर्णित ब्लॉकच्या क्षेत्र किंवा क्षेत्राच्या-- परंतु त्यापैकी या प्राधिकरणाच्या दिनांक २ फेब्रुवारी, १९८४ ची नोटीस क्र.टीसीपी(पी-१)/बीबीएस/२४४ च्या अनुसूचीत वर्णित क्षेत्र किंवा क्षेत्रे वगळून--विकसनासाठी प्रारुप प्रस्ताव तयार करुन ते प्राधिकरणाला सादर करण्यास ह्या ठरावाव्दारे मान्यता देत आहे."

बाब क्र.११ : मुंबई महानगर प्रदेशातील मत्स्यव्यवसाय अभ्यास गटाचा अहवाल

वरील बाबीवर विचार करुन प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.२७१ :

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेशातील मत्स्योद्योगाचा अभ्यास करण्यासाठी नेमण्यात आलेल्या अभ्यास गटाने सादर केलेल्या अहवालाची हे प्राधिकरण नोंद घेत आहे आणि अभ्यास गटाच्या अहवालातील शिफारशी संदर्भात पुढील आवश्यक कार्य करण्यासाठी हे प्राधिकरण महानगर आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे."

शेवटी, सभाध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त झाले.

--------

MINUTES OF THE THIRTY-FIFTH MEETING OF THE BOMBAY METROPOLITAN REGION DEVELOPMENT AUTHORITY

DATE : 28th September 1984(Friday)

TIME : 11.00 A.M.

PLACE : The Hon'ble Chief Minister's Committee Room (6th Floor), Mantralaya.

MEMBERS PRESENT:

| | |
|---|---|
| Shri Vasantrao Patil<br>Hon.Chief Minister and Minister for Urban Development. | - Chairman |
| Shri Yusuf Hafiz,<br>M.L.A. | - Member |
| Shri Nakul Pundalik Patil,<br>M.L.A. | - Member |
| Dr. Rammanohar V. Tripathi,<br>M.L.C. | - Member |
| Shri R.D. Pradhan,<br>Chief Secretary to the Govt. of Maharashtra. | - Member |
| Shri D.M.Sukthankar,<br>Municipal Commissioner, Bombay Municipal Corporation. | - Member |
| Shri L.C. Gupta,<br>Managing Director, CIDCO. | - Member |
| Shri A.N. Batabyal,<br>Metropolitan Commissioner. | - Member-Secretary |

Sarvashree Yusuf Hafiz, Nakul Pundalik Patil and Dr. Rammanohar V. Tripathi, the newly-appointed members on the Authority were present at the Meeting for the first time. The Honourable Chairman welcomed the new members.

Item No.1 : Confirmation of the minutes of the last (34th) Meeting.

The minutes were confirmed.

Item No.2 : Action taken on the minutes of the last (34th) Meeting.

The action taken report was noted by the Authority.

....2/-

Item No.3 : Disposal and determination of premium for Commercial Plots C-23 and C-24 and Residential Plot No.I in 'E' Block of Bandra Kurla Complex.

Placing the item for consideration, the Metropolitan Commissioner informed that the Collector, Central Excise (I), Bombay has sent a Cheque of due amount to this Authority in respect of the payment towards the transfer of the plot. The payment has been made despite Authority's express understanding to him that the allotment of the said plot shall be subject to the approval of the Bombay Metropolitan Region Development Authority.

After consideration of the item, the Authority decided to allot Commercial Plots to (1) The Collector, Central Excise(I), Bombay and (2) Asstt.Director, Subsidiary Intelligence Bureau, Govt. of India on each respectively and one Residential Plot to the Collector, Central Excise(I), Bombay. Similarly, the Authority also fixed the Premium of Rs.2,800/- per FSI square metre for the Commercial Plot and Rs.1,800/- per F.S.I. square metre for the Residential Plot and accordingly passed the following Resolution :-

RESOLUTION NO.263 :

"RESOLVED THAT in modification to its earlier Resolution No.248 passed by the Authority in its meeting held on the 28th March,1984, the BombayyMetropolitan Region Development Authority under sub-section (2) of Section 3 of the BMRDA Act,1974 hereby approves the allotment of (1) two Commercial Plots viz. C-23 and C-24 in 'E' Block of Bandra-Kurla Complex at the rate of Rs.2,800/- per F.S.I.square metre to (i) The Collector, Central Excise (I), Bombay and (ii) The Assistant Director, Subsidiary Intelligence Bureau, Govt. of India and (2) one Residential Plot 'F' in 'E' Block of Bandra-Kurla Complex at the rate of Rs.1,800/- per F.S.I. square metre to the Collector, Central Excise(I), Bombay and also hereby empowers the Metropolitan Commissioner to make the offers, in above respect to the allottes.

....3/-

"RESOLVED FURTHER THAT the Authority hereby, empowers the Metropolitan Commissioner to make necessary alterations in the proforma of the Lease-Agreement and the Lease-Deed, if any, with a view to execute the same with the Allottees."

Item No.4 : Minor modifications to the Planning proposals of Block 'F' in Bandra-Kurla Complex : Land grant to the Centre for the Study of Social Change.

The Authority considered the Item Note and passed the following Resolution :-

RESOLUTION NO.264 :

"RESOLVED THAT a plot of land about 1.06 Ha. be earmarked in 'F' Block of Bandra-Kurla Notified area for the Centre for the Study of Social Change and the Centre will bear the channelisation charges at the rate of Rs.150/- per sq. metre of the plot area.

"RESOLVED FURTHER THAT the Authority being the Special Planning Authority for the Bandra-Kurla Notified Area appointed under section 40(1)(c) of the MRTP Act, 1966 (Maharashtra Act No.XXXVII of 1966) do in exercise of its powers under Section 40(3) read with Section 113(8) jointly with Section 37 of the said Act and all other powers enabling it in this behalf, approve of the planning proposals, sanctioned by the State Government under Notification No.BKR-1177/262-UD-5, dated the 9th April, 1979, being modified as described in the agenda note. The Authority also directs that the Metropolitan Commissioner shall consider and finalise the modification as may emerge after discussions with the Revenue and Forests Department, Urban Development Department and Housing Department.

"RESOLVED FURTHER THAT the Authority do in exercise of the powers under Section 37 of the said act and all other powers enabling it in this behalf approve of a Notice being published in the Official Gazette and in two local newspapers being the 'Times of India' or 'Free Press Journal' and the 'Loksatta' inviting objections and suggestions from the public with respect of such

.....4/-

modifications not later than 1 month from the date of such Notice.

"RESOLVED FURTHER THAT the Authority do in exercise of its powers under Section 139 of the said act read with Section 7(A) of the Bombay Metropolitan Region Development Authority Act, 1974 authorise the Metropolitan Commissioner to publish the Notice in accordance with the foregoing Clauses.

"RESOLVED FURTHER THAT the Authority do in exercise of its powers under Section 151(3) of the said Act direct that the Metropolitan Commissioner shall consider the objections/suggestions which may be received in this behalf, after giving hearing to persons presenting such objections/suggestions and shall submit his report to the State Government alongwith proposed modifications for final sanction in terms of Section 37 of the said Act."

Item No.5 : Planning Proposals for Oshiwara District Centre.

Before the discussion on the Item began, Shri Yusuf Hafiz, the Member, pointed out that the Bombay Municipal Corporation had demolished some hutments which came within the layout of the District Development Centre Plan to enable it to undertake construction of a road adjacent to the Crematorium. He urged the Authority to provide alternate site for rehabilitating these hutments. The Metropolitan Commissioner clarified that the alternate site now sought for rehabilitation being in the core commercial area of the District Centre, the same cannot be provided for this purpose. The Metropolitan Commissioner added, that he would discuss the matter with the concerned officers of the Maharashtra Housing and Area Development Authority to find a solution.

After consideration of Item the Authority passed the following Resolution :-

RESOLUTION NO.265 :

"RESOLVED THAT in exercise of its powers under clause (d) of Sub-Section 3 of Section 40 of the

....5/-

MRTP Act 1966 (hereinunder referred to as the said Act) read with Government Notification No.TPB/4382/26-UD-5 dated 18th June 1982 and all other powers enabling it in this behalf, the Metropolitan Authority within its jurisdiction as the Special Planning Authority for the Oshiwara District Centre Notified Area, approves the publication of the draft planning proposals for the lands specified in the said Government Notification together with a notice in the Maharashtra Government Gazette and two local newspapers being -

i) Times of India or Free Press Journal,
ii) Loksatta

in the manner prescribed under Section 26 of the said Act for inviting suggestions/objections thereto from the public within a period of not less than 30 days from the date of the notice in the Maharashtra Government Gazette.

"RESOLVED FURTHER THAT the aforesaid Notice be given and published under the signature of Metropolitan Commissioner being the Secretary to the Metropolitan Authority pursuant to Section 137 of the said Act.

"RESOLVED FURTHER THAT in exercise of its powers under Sub-Section 2 of the Section 28 of the said Act and all other powers enabling it in this behalf, the Metropolitan Authority do approve to forward all objections and suggestions to be received to the aforesaid draft proposals to the Planning Committee consisting of the following members of the Metropolitan Authority that is to say -

i) Shri Yusuf Hafiz;
ii) The Municipal Commissioner, M.C.G.B.
iii) The Metropolitan Commissioner, BMRDA.

with a direction to deal with them in accordance with the Law for the time being in force."

<u>Item No.6 :</u> Revision of grade of Junior Engineers and grant of higher start to Deputy Engineers, etc. as per Govt. Orders.

The Authority considered the Item and passed the

following Resolution :-

RESOLUTION NO.266 :

"RESOLVED THAT in pursuance of Government Resolution in Irrigation Department No.CDS-1582/158 (215) A (10), dated the 16th April,1974, the Authority hereby approves that :

i) the Junior Engineers fulfilling the conditions laid down in the said Government Resolution be given the grade of Rs.600-950 by designating them as 'Deputy Engineers Grade II';

ii) the Deputy Engineers be given higher start of Rs.660/- in their existing grade of Rs.600-1150 by changing their designation as 'Deputy Engineer Grade I'; and

iii) effect to the proposals mentioned in (i) and (ii) above ben given from 1st April,1981 and the total number of the posts of the Deputy Engineer Grade II shall not be more than 25% of total number of the posts of the Junior Engineers."

Item No.7 : Grant of Interim Relief to BMRDA Employees.

The Authority considered the item and passed the following Resolution :-

RESOLUTION NO.267 :

"RESOLVED THAT the Authority hereby approves grant of Interim Relief to the BMRDA Employees with effect from 1st June 1983 on the lines of Interim Relief granted to Govt. employees vide Govt. Resolution in Finance Department, No.PCR-1083/CR-1084/SER-7, dated 11th September,1984 as proposed."

(383)

Item No.8 : Annual Report by the BMRDA as a Special Planning Authority for Bandra-Kurla Complex Notified Area for the year 1983-84.

The Authority considered the Item and passed the following Resolution :-

RESOLUTION NO.268 :

"RESLOVED THAT the Authority hereby approves the draft of the Annual Report for the year 1983-84 of the BMRDA as a Special Planning Authority for Bandra-Kurla Complex Notified Area as required under Section 133 of the MRTP Act 1966 and authorises the Metropolitan Commissioner to submit the same to the State Government."

Item No.9 : Development of Block 'D' of Bandra-Kurla Complex Construction of culvert across nalla to join the Western Express Highway.

The Authority considered the Item and passed the following Resolution :-

RESOLUTION NO.269 :

"RESOLVED THAT the Authority approves the expenditure of Rs.1,87,500/- as a proportionate share of the BMRDA to meet the cost of culvert proposed to be constructed to join Anant Kanekar Marg to the Western Express Highway and authorises the Metropolitan Commissioner to pay proportionate share of additional cost, if any, to the Public Works Department on demand."

Item No.10 : Backbay Reclamation Scheme Block No.III Change of User of Plot No.148 of ....

The Metropolitan Commissioner while placing the Item for consideration informed that the application for development of NCPA plot as per the user permitted by Govt. under Govt. in Revenue and Forests Department, Government Regulation No.LBL-2565/40559/ Part III/G-8, dated 20th October, 1983 has been received but the draft development plan published by the Bombay Municipal Corporation shows the plot with red wash. The red wash is an indication for

...8/-

public purpose. The Authority directed that users in NCPA plot should be permitted as per Govt. orders.

After consideration of the Item the Authority passed the following Resolution :-

RESOLUTION NO.270 :

"RESOLVED THAT the Authority do record Government letter, No.BBR 1084/3665/UD-5, dated 4th September, 1984.

"RESOLVED FURTHER THAT the Authority do in exercise of its powers under Clause (d) of Sub-section (3) of Section 40 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 and all other powers enabling it in this behalf approve of draft proposals for development being prepared and placed before the Authority at its meeting in respect of an area or areas of Blocks described in the Schedule to Government Notification, Urban Development Department, No.BBR 1082/CR-140/1687/UD-1, dated the 15th June, 1983 but excluding area or areas thereof described in the Schedule to Notice No.TCP(P-1)/BBS/244, dated 2nd February 1984 of the Authority."

Item No.11 : Report of the Study Group on Fisheries in B.M.R.

The Authority considered the Item and passed the following Resolution :-

RESOLUTION NO.271 :

"RESOLVED THAT the Authority do hereby take note of the Report of Study Group on fisheries in Bombay Metropolitan Region, and authorises the Metropolitan Commissioner to take such further action on the recommendations of the report as may be necessary."

The meeting concluded with a vote of thanks to the Chair.

---------

LP:841016: